**विषय - पंच समिती च्या लीगल सब कमिटी ची पहली बैठक.**

**दिनांक - 24/12/22**

आज पंच समिती च्या विधी समिती ची पहली बैठक सकाळी 11 वाजता सोसायटी ऑफिस मधे झाली. ह्यात श्री विजय सावंत, श्री अनंत शाळिग्राम, श्रीमती ऋता बावडेकर आणि श्री प्रदीप नेवाळकर उपस्थित होते. श्री सुवर्णकांत ठाकोर पुण्या बाहेर असल्याने बैठकी ला येऊ शकले नाही.

बैठकीत मुख्य दोन विषयांवर चर्चा झाली.

1. कलेक्टर ऑफिस मधून जी 80 सदस्यांची जुनी लिस्ट आपल्याकडे आली आहे ती दुरुस्त करून अद्यावत (102 सदस्यांची) करायची आहे. ह्या करिता संस्थे च्या पूर्णत्वाच्या वेळेस 1979 साली असलेली सदस्यांची यादी तसेच आज असलेली सदस्यांची यादी तैयारी करावी लागणार आहे. 1979 पासून आज पर्यंत प्रत्येक फ्लॅट / डुप्लेक्स च्या मालकी हक्का मधे जे बदल झाले आहे त्याचा पण तपशील घ्याव्या लागेल. नंतर ही up to date माहिती कलेक्टर ऑफिस ला एका डिटेल्ड पत्रा द्वारे देऊन तिथले रेकॉर्डस अद्यावत करून घ्यावे लागतील. ह्या करिता जी प्रोसीजर असेल ती पूर्ण करावी लागेल.

1979 ला असलेल्या सदस्यांची यादी सोसायटी कडे आहे. त्या नंतर फ्लॅट्स / डुप्लेक्स च्या मालकी हक्कात जे बदल झाले ते ही आपल्याला माहीत आहे. गरज आहे ती बदल झालेल्या सभासदांन कडून त्या बद्दल चे डॉक्युमेंट्स च्या झेरॉक्स कॉपीज मिळवण्याची. काही सभासदांनी आवश्यक पेपर्स संस्थे कडे नुकतेच दिले आहेत. ते तपासून उरलेल्या सभासदांना प्रत्यक्ष भेटून हे पेपर्स मिळविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. हे काम विधी कमिटी सदस्य येत्या 5 जानेवारी पासून दोन टीम करून सुरू करतील. ह्या आधी संस्थेच्या सभासदांना ह्या बद्धल ची माहिती तसेच त्याची आवश्यकता कळविण्यात येईल.

2. दुसरा विषय, संस्थे च्या वर्ग वारी मधे जो बदल करायचा आहे (ब वर्गा तून अ वर्गा मधे) त्या साठी काय प्रोसीजर अवलंबवायला हवा ह्याची माहिती करून घेण्या चा होता. ह्या साठी जर कुठले फॉर्म्स असतील तर ते आणून त्यात आवश्यक असलेल्या सर्व पेपर्स ची जुळवा जुळव करून ह्या कामा ला चालना देण्याचे ठरवण्यात आले. श्री ठाकोर आणि श्री नेवाळकर नाताळच्या सुट्टी संपल्यानंतर ह्या कामाला गति देतील.

**प्रदीप नेवाळकर**
**पंच समिती साठी**